# प्रेस नोट

ला.प्र.वि, जळगाव
दि.१३/०४/२०२६.

**लोकसेवक पो.ना/४० विनोद पितांबर अहिरे, नेम– शनिपेठ पोलीस स्टेशन, जळगाव, रा. बिल्डिंग नं. ए–५, रूम नं ४० पोलीस लाईन, जळगाव यांचेवर यशस्वी सापळा कारवाई केले बाबत**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | जळगाव |
| **फिर्यादी** | हेमंत खंडु नागरे, वय ३७ वर्षे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., जळगाव |
| **पोलीस ठाणे व गुन्हा नोंद क्रमांक** | शनिपेठ पोलीस स्टेशन जि.जळगाव गु.र.नं. /२०२६ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **लाचेची मागणी रक्कम** | २,००,०००/– रूपये |
| **तंडजोडअंती स्विकारलेली रक्कम** | १,००,०००/– रूपये |
| **थोडक्यात हकिगत** | मुळ तक्रारदार हे जळगाव येथील रहिवासी असुन त्यांचे मुलाविरूध्द शनिपेठ पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दाखल होता. नमुद अर्जाची चौकशी आरोपी लोकसेवक पोना/ विनोद अहिरे यांचेकडे सुरू होती. नमुद अर्जामध्ये तक्रारदार यांचे मुलावर कोणतीही कायदेशीर कारवाई न करता अर्ज निर्गती करण्यासाठी आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे २,००,०००/– रूपये लाच मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी आलोसे पोना/विनोद अहिरे यांचेविरूध्द दि.१३/०४/२०२६ रोजी ला.प्र.वि.जळगाव यांचे कडे तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आज दि.१३/०४/२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे पोना/विनोद अहिरे यांनी तक्रारदार यांचे मुलावर कोणतीही कायदेशीर कारवाई न करता अर्ज निर्गती करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष १,००,०००/– रूपये लाच मागणी करून ती स्विकारण्यास संमती दर्शविली होती.<br>यशस्वी सापळा कारवाई दरम्यान आलोसे पोना/विनोद अहिरे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार हे शनिपेठ पोलीस स्टेशन येथे गेले असता आलोसे यांनी पोलीस स्टेशनच्या बाहेर तक्रारदार यांचे कडुन १,००,०००/–रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली, म्हणुन यांचेविरूध्द शनिपेठ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याचे कामकाज सुरू आहे. |
| | **पर्यवेक्षण अधिकारी–** श्री.योगेश ठाकुर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि., जळगांव.<br>**सापळा अधिकारी –** श्री. हेमंत नागरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,जळगांव.<br>**सापळा पथक –** श्रे.पोउप.निरी.सुरेश पाटील,मपोहेकॉ/संगिता पवार, पोकॉ/राकेश दुसाने, पोकॉ/सचिन चाटे, पोकॉ/अमोल सुर्यवंशी, सर्व नेम.ला.प्र.वि.जळगांव<br>**तपास अधिकारी –** श्री.स्मिता नवघरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.जळगांव |
| **मार्गदर्शन** | **१) मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा.श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरिकांना आहवान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र नाशिक येथे सपंर्क करावा.

सपंर्क पत्ता :– ला.प्र.वि.कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगाव
संकेतस्थळ :– acbmaharastra.gov.in
ई मेल/ऑनलाईन तक्रार :– spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com
टोल फ्रि क्रमांक :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :– ०२५७–२२३५४७७
व्हॉट्सअप मोबाईल क्रमांक :– ७५८८९९१०६४

१३/०४/२६
योगेश जी. ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

Scanned with OKEN Scanner